| | |
|---|---|
| [QR code] | **विशेष दिवाणी दावा क्र. ७/२०२५ मधील निशाणी क्रमांक २८ खालील आदेश**<br>**(CNR No. MHWS050001452025)** |

१) प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादीं क्र. १ ते ४ तर्फे त्यांचे विरुध्द झालेला विना लेखी जबाबाचा आदेश रद्द करुन लेखी जबाब दाखल करण्यास झालेला विलंब माफ करुन लेखी जबाब दाखल करण्याची परवानगी मिळण्यासाठी दिलेला आहे.

२) सदरचा अर्ज वाचला. त्यास वादींच्या विधीज्ञांनी त्याच अर्जावर दिलेले लेखी म्हणणे विचारात घेतले. प्रतिवादी क्र. १ ते ४ यांच्यातर्फे विधिज्ञ श्री.एच.जी.राठी यांचा आणि वादीतर्फे विधीज्ञ श्री. एफ.एस.खान यांचा युक्तिवाद ऐकला.

३) प्रतिवादी क्र.१ ते ४ यांचे विधिज्ञांनी असा युक्तिवाद केला की, प्रस्तुतचा दावा प्रतिवादींना आवश्यक असलेली कागदपत्रे व माहिती मिळाल्यानंतर त्यांनी त्यांच्या वकीलांशी संपर्क केला परंतू वकील आणि प्रतिवादी यांच्यातील गैरसंवादामुळे (miscommunication) प्रतिवादी कायदेशीर मुदतीत त्यांचा लेखी जबाब दाखल करु शकले नाहीत. त्यामुळे प्रतिवादींच्या विरुध्द विना लेखी जबाबाचा आदेश दिनांक १७.१०.२०२५ रोजी पारीत झाला आहे. प्रतिवादी यांना त्यांचा लेखी जबाब दाखल करण्यास ४७ दिवसांचा विलंब झालेला आहे. तरी, प्रतिवादी क्र. १ ते ४ यांच्याविरुध्दचा विनालेखी जबाबचा आदेश रद्द करण्यात यावा, तसेच लेखी जबाब दाखल करण्यास झालेला विलंब माफ करण्यात यावा आणि प्रस्तुतच्या अर्जासोबत प्रतिवादी क्र. १ ते ४ यांच्या वतीने दाखल केलेला लेखी जबाब अभिलेखावर घेण्यात यावा.

४) याउलट वादी यांच्या विधीज्ञांनी असा युक्तीवाद केला की, प्रतिवादी क्र. १ ते ४ यांना दि. २५.३.२०२५,२७.३.२०२५,३०.३.२०२५ व १२.७.२०२५ रोजी या दाव्याचे समन्स मिळालेले आहे परंतू प्रतिवादी क्र. १ ते ४ यांनी जाणीवपुर्वक विहीत मुदतीत त्यांचा लेखी जबाब दाखल केलेला नाही आणि विलंबास नमुद केलेले कारण योग्य नाही. त्यामुळे प्रतिवादी क्र. १ ते ४ यांचा प्रस्तुतचा अर्ज नामंजुर करण्यात यावा अथवा अर्ज मंजूर करावयाचा झाल्यास जास्तीत जास्त खर्च आकारण्यात यावा.

५) अभिलेखाचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, निशाणी क्र. १ खालील दि. १७.१०.२०२५ रोजीच्या आदेशानुसार प्रस्तुतचा दावा प्रतिवादी क्र. १ ते ४ यांच्या लेखी जबाबाविना चाललेला आहे. बेलीफच्या निशाणी क्र. १३ ते १६, २२,२३ व २५, २६ खालील अहवालानुसार प्रतिवादी क्र. १ ते ४ यांना या दाव्याचे समन्स दिनांक २५.३.२०२५, २७.३.२०२५,३०.३.२०२५ आणि १२.७.२०२५ रोजी मिळालेले आहे. त्यानंतर प्रतिवादी हे या दाव्यात वकीलपत्र निशाणी क्र.७,१० व १९ नुसार, दिनांक २८.३.२०२५, ११.४.२०२५ आणि

१८.७.२०२५ रोजी हजर झाले.  परंतु प्रतिवादी क्र.१ ते ४ यांनी कायदेशीर मुदतीत त्यांचा लेखी जबाब दाखल केलेला नाही.

६)    दिवाणी प्रक्रीया संहिता, १९०८ मधील आदेश ८ नियम १ नुसार दाव्याचे समन्स मिळाल्यापासून जास्तीत जास्त ९० दिवसांच्या आत प्रतिवादीने त्यांचा लेखी जबाब दाखल करणे आवश्यक आहे. या दाव्याचे समन्स प्रतिवादी क्र. १ ते ४ यांना या दाव्याचे समन्स प्रथमतः दिनांक २५.३.२०२५ रोजी मिळालेले आहे आणि प्रतिवादी क्र. १ ते ४ यांचेतर्फे प्रस्तुतचा अर्ज दिनांक ६.१२.२०२५ रोजी दिलेला आहे.  उपरोक्त दोन्ही तारखा विचारात घेतल्या तर प्रतिवादी क्र. १ ते ४ यांना त्यांचा लेखी जबाब दाखल करण्यास ५ महिने ९ दिवसांचा विलंब झालेला आहे असे दिसून येते.

७)    हे सर्वज्ञात आहे की, कोणताही दावा गुणदोषावर निकाली निघणे आवश्यक आहे. त्यासाठी दोन्हीही पक्षकारांना पुरेशी संधी मिळणे गरजेचे आहे. वादींनी प्रतिवादींविरुध्द प्रस्तुतचा दावा सौदे चिठ्ठीवरुन खरेदी खत होवून मिळणेसाठी दाखल केलेला आहे. वादींनी कागदपत्राची यादी निशाणी क्र. ४ सोबत दिनांक ८.१.२०२४ रोजीच्या सौदे चिठ्ठीच्या लेखाची छायांकीत प्रत दाखल केलेली आहे व त्याचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, ते सौदी चिठ्ठी वादी क्र. १ ते ४ आणि प्रतिवादी क्र. १ ते ४ यांच्यामध्ये नोटरी केलेली आहे. या परिस्थितीत प्रतिवादी क्र.१ ते ४ यांचा लेखी जबाब अभिलेखावर आला तर प्रस्तुतचा दावा गुणदोषावर निकाली करण्यास तो उपयुक्त ठरु शकतो. प्रतिवादी क्र.१ ते ४ यांना त्यांचा लेखी जबाब दाखल करण्यास झालेला विलंब काही खर्च आकारुन माफ करता येवू शकतो.  त्यामुळे उपरोक्त सर्व परिस्थिती, प्रतिवादी क्र. १ ते ४ यांच्या विधिज्ञांचा उपरोक्त युक्तिवाद विचारात घेऊन नैसर्गिक न्यायाच्या दृष्टीने व प्रस्तुतचा दावा गुणदोषावर निकाली निघण्यासाठी, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे,

## **आदेश**

**१]** प्रस्तुतचा अर्ज नि.२८ हा रक्कम रुपये ५०००/- च्या खर्चावर मंजूर करण्यात येत आहे. तसेच निशाणी क्र .१ खालील दि. १७.१०.२०२५ रोजीचा प्रतिवादी क्र. १ ते ४ यांच्या विरुध्दचा आदेश रद्द करण्यात येत आहे. तसेच प्रतिवादी यांना त्यांचा लेखी जबाब  दाखल करण्यास झालेला ५ महिने ९ दिवसांचा विलंब माफ करण्यात येत आहे

**२]** प्रतिवादी क्र.१ ते ४ यांनी वैयक्तीक अथवा संयुक्तरित्या उपरोक्त नुसारची खर्चाची रक्कम रु. ५०००/- ही वादींना दिल्यानंतरच त्यांचा लेखी जबाब अभिलेखावर घेण्यात येईल.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by HAMBIRE DHANANJAY BHAGWANRAO
Date: 2026.01.02 16:54:04 +0530

स्थळ :मंगरुळपीर
दिनांक :  ०२.०१.२०२६

( ध. भ. हंबीरे )
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, मंगरुळपीर

I affirm that the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | C.R.Gadge |
| Name of Court | : | Shri. D. B. Hambire,<br>Civil Judge Senior Division,<br>Mangrulpir. |
| Date of Decision | : | 02.1.2026 |
| Order signed by the P.O. on | : | 02.1.2026 |
| Order Uploaded on | : | 02.1.2026 |